पवित्र पोर्टलमार्फत करण्यात येत असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शिक्षक पदभरतीमध्ये शैक्षणिक वर्षा अखेर रिक्त होणारी संभाव्य रिक्त पदे विचारात घेण्याबाबत.....

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण- २०२५/प्र.क्र. ९५३/टीएनटी-१**
**हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक : ०१ जानेवारी, २०२६.**

वाचा :

१. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय, क्र. संकीर्ण-२०२३/प्र.क्र. १७४/टीएनटी-१, दि. २१.०६.२०२३.
२. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. आस्था-क/प्राथ-१०६/ शै.स-रि.पदे/२०२५/१६०८७१९, दि. १६.१२.२०२५

**प्रस्तावना :**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षक पदभरती पवित्र पोर्टलमार्फत करण्यात येत आहे. उपरोक्त संदर्भाधीन क्र. १ येथील शासन निर्णयान्वये सद्यस्थितीत ८०% पर्यंत रिक्त पदे भरण्याची तरतूद आहे. शिक्षक अभियोग्यता व बुध्दिमत्ता चाचणी-२०२५ मधील निकालाच्या आधारे पदभरतीची कार्यवाही करण्यात येत आहे. दरवर्षी सेवानिवृत्ती व संचमान्यतेनुसार उपलब्ध होणा-या रिक्त पदांवर प्रत्यक्ष अध्यापनाचे कार्य करण्यासाठी शिक्षक उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ मधील तरतूदीनुसार शाळांतील पदे १०% पेक्षा अधिक पदे रिक्त ठेवता येणार नसल्याची बाब विचारात घेता, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांतील शैक्षणिक वर्ष २०२५-२६ अखेर संभाव्य रिक्त पदे भरतीसाठी विचारात घेण्यास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील त्या शाळांच्या संचमान्यतेनुसार शैक्षणिक वर्ष २०२५-२६ अखेर म्हणजे माहे मे-२०२६ अखेर संभाव्य रिक्त होणारी पदे विचारात घेऊन संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयात नमूद मर्यादेत शिक्षक अभियोग्यता व बुध्दिमत्ता चाचणी-२०२५ मधील गुणांकनाच्या आधारे शिक्षक संवर्गातील पदभरती करण्यास शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०१०११२१२४५००२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by ABASAHEB ATMARAM KAWALE
Date: 2026.01.01 12:14:32 +05'30'

(आबासाहेब कवळे)

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास / वित्त) यांचे प्रधान सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
४) मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५) मा. उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
७) मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
८) मा. विरोधी पक्षतेता, विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
९) मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
१०) मा. राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
११) मा. विधानसभा/विधानपरिषद सदस्य (सर्व)
१२) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
१३) प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१६) शिक्षण संचालक (प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक/योजना), महाराष्ट्र राज्य, पुणे
१७) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
१८) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१९) सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक/योजना)
२०) सर्व गट शिक्षणाधिकारी
२१) निवड नस्ती- टीएनटी-१